# <u>अधिसूचना</u>

विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक १८ जानेवारी, २०००.

भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२.

क्रमांक :- आयपीए १०९३/१३४/(४३)/का.पंधरा, महाराष्ट्र राज्यात लागू असेल त्याबाबतीत भारतीय भागीदारी अधिनियम १९३२ (१९३२ चा अधिनियम ९) च्या कलम ७० अ च्या पोटकलम (२) खालील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन, सदर अधिनियमातील उद्दिष्टे पार पाडण्यासाठी केलेला खर्च विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या परिशिष्ट-१ च्या (यापुढे याचा उल्लेख उक्त परिशिष्ट असा करण्यांत आलेला आहे) स्तंभ-२ मध्ये विहित केलेल्या शुल्काच्या कमाल रकमेत खालीलप्रमाणे वाढ करत आहे आणि त्या उद्दिष्टांसाठी उक्त परिशिष्ट खालीलप्रमाणे सुधारित करीत आहे. ते असे :- उक्त परिशिष्टातील स्तंभ(२) मध्ये :

(१) नोंद (१) मध्ये पन्नास रुपये या शब्दांऐवजी तीनशे रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(२) नोंद (२) मध्ये पंचवीस रुपये या शब्दांऐवजी दिडशे रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(३) नोंद (३) मध्ये पंधरा रुपये या शब्दांऐवजी शंभर रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(४) नोंद (४) मध्ये पंधरा रुपये या शब्दांऐवजी शंभर रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(५) नोंद (५) मध्ये पंधरा रुपये या शब्दांऐवजी शंभर रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(६) नोंद (६) मध्ये पंधरा रुपये या शब्दांऐवजी शंभर रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(७) नोंद (७) मध्ये पंधरा रुपये या शब्दांऐवजी शंभर रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(८) नोंद (८) मध्ये पंधरा रुपये या शब्दांऐवजी शंभर रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(९) नोंद (९) मध्ये पंधरा रुपये या शब्दांऐवजी शंभर रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(१०) नोंद (१०) मध्ये सात रुपये आणि पन्नास पैसे या शब्दांऐवजी वीस रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

(११) नोंद (११) मध्ये सात रुपये आणि पन्नास पैसे या शब्दांऐवजी वीस रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील,

Seal............
Office of the
Assistant Registrar of Firms
AURANGABAD
No. 116/2000
Date 25 JAN 2000

(१२) नोंद (१२) मध्ये दोन रुपये या शब्दांऐवजी दहा रुपये हे शब्द दाखल करण्यांत येतील.

(१३) नोंद (१३) मध्ये एक रुपया हे शब्द तसेच रहातील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( ज. का. दास )
शासनाचे सह सचिव

---

क्रमांक : आयपीए १०९३/१३४/(४३)-पंधरा,
विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १४ जानेवारी, २०००.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ च्या आगामी अंकात प्रसिध्द करण्यासाठी व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, मुंबई यांना अग्रेषित. त्यांना विनंती करण्यांत येते की, सदर अधिसूचनेच्या प्रत्येकी ५० प्रती या विभागास तसेच निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना त्वरीत पाठवाव्यात.

( ज. का. दास )
शासनाचे सह सचिव

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

१) निबंधक, भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) सहाय्यक निबंधक, भागीदारी संस्था, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद विभाग.